| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | | २३/०४/२०२६ |
| नोंदणी दिनांक | – | २३/०४/२०२६ |
| निकाल दिनांक | – | ०२/०७/२०२६ |
| कालावधी | – | वर्षे महिने दिवस |
| | | – ०२ ०९ |

**सिंधुदुर्ग – ओरोस येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात मु. ओरोस.**

(श्री.एस.टी.त्रिपाठी, अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे समोर )

**फौजदारी रिव्हीजन अर्ज क्र. २८/२०२६ निशाण क्र.११**

**सी एन.आर.क्र. – एमएचएसआय ०१–०००४१६२०२६**

श्री. मयुर मनोहर सुर्वे, ,
वय – ३१ वर्षे, धंदा –शेती व नोकरी,
रा. सुर्वेवाडी, नेर्ले, ता.वैभववाडी,
जि.सिंधुदुर्ग.
} अर्जदार

**विरुध्द**

१. विशेष कार्यकारी दंडाधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग.
२. पोलीस निरीक्षक – वैभववाडी, पोलीस ठाणे, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग.
} सामनेवाले.

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४३८ व ४४०**

**अन्वेय रिव्हीजन**

==================================

अर्जदार तर्फे विधिज्ञ – श्री. वाय.आर.खानोलकर,

उत्तरवादी तर्फे अति.जिल्हा सरकारी वकील – श्री.आर.व्ही.देसाई.

===================================

## – न्याय निर्णय –

(जाहीर केला दिनांक ०२ जुलै, २०२६)

प्रस्तुतचा रिव्हीजन अर्ज चॅप्टर केस क्र.०६/२०२६ मध्ये दि.२१/०४/२०२६ रोजी विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम १३० प्रमाणे दिलेल्या कारणे दाखवा नोटीस व बंधपत्र यास आव्हानीत करुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४३८ व ४४० अन्वेय रिव्हीजन अर्ज दाखल केलेला आहे.

रिव्हीजन अर्जातील थोडक्यात मजकूर खालील प्रमाणे –

२. अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी अर्जदार यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम १३० प्रमाणे पाठविलेली कारणे दाखवा नोटीस ही बेकायदेशीर आहे. सदर नोटीस विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी न्यायीक विचार केलेला नसून त्यांनी अत्यंत मोठी चूक केलेली आहे. विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांच्याकडे अर्जदार यांनी सार्वजनिक शांततेचा भंग केला असे दाखविणारे कोणतेही पुरावे उपलब्ध नाहीत, असे असतानाही कारणे दाखवा नोटीस पाठविणेत आली आहे. त्यानंतर अर्जदार यांच्याकडून कोणतीही चौकशी न करताच जबरदस्तीने दि.२१/०४/२०२६ रोजी अंतरिम बंधपत्र घेण्यात आले. सदरची नोटीस ही केवळ राजकीय दबावापोटी पाठविणेत आलेली आहे. कार्यकारी दंडाधिकारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १३०,१३२ आणि

१३३ या मधील अनिवार्य तरतुदींचा विचार केलेला नाही.

३. मुळातच वैभववाडी पोलिसांनी पाठविलेला सदरचा कारवाईचा प्रस्ताव हा त्यांच्याच विभागातील विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडे पाठविलेला असून सदरचा विभाग हा पोलिसांचाच एक विभाग असून सदरचे विशेष कार्यकारी दंडाधिकारी हे सिंधुदुर्गचे अतिरिक्त पोलीस अधिक्षक आहेत. याचाच अर्थ पोलिसांनी पाठविलेल्या प्रस्तावाची चौकशी अधिकारी/न्यायीक अधिकारी हे देखील पोलीसच आहेत. त्यामुळे या ठिकाणी अर्जदार याची कोणतीही निःपक्षपातीपणे चौकशी होणार नाही ही सत्य परिस्थती आहे. खरोखरच निरपेक्ष सुनावणी व्हावी असे वैभववाडी पोलिसांचे मत असते तर प्रस्तुतचा प्रस्ताव हा विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे पाठविला गेला असता परंतु, तसे या ठिकाणी घडलेले नाही. त्यामुळे नोटीस व अंतरिम बंधपत्र रद्दबातल ठरविण्यात यावे व रिव्हीजन अर्ज मंजूर करणेत यावा.

४. अर्जदार यांच्या विद्वान विधिज्ञांतर्फे असा युक्तिवाद करणेत आला की, विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी अर्जदार यांना फौजदरी प्रक्रिया संहिता कलम १३० अन्वये पाठविलेली कारणे दाखवा नोटीस व अंतरिम बंधपत्र हे बेकायदेशीर आहे. कार्यकारी दंडाधिकारी यांनी न्यायीक विचार केलेला नाही. कार्यकारी दंडाधिकारी यांनी अत्यंत मोठी चूक केलेली आहे. वस्तुत: विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांच्याकडे अर्जदार यांनी सार्वजनिक शांततेचा भंग केला असे दाखविणारे कोणतेही पुरावे उपलब्ध नव्हते असे असतानाही सदरची कारवाई केवळ राजकीय दबावापोटी केलेली आहे. त्यामुळे एखादया व्यक्तीविरुध्द केवळ गुन्हा दाखल झाला म्हणून अशा प्रकारची कार्यवाही करता येणार नाही.

५. सरकारपक्षातर्फे असा युक्तिवाद करणेत आला की, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १३० व १३२ नुसार काढलेली कारणे दाखवा नोटीस हा कार्यकारी दंडाधिकारी यांचा संभाषणात्मक (Interlocutory) आदेश आहे. या आदेशाविरुध्द मा . उच्च न्यायालयातच केवळ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४३८ व भारतीय राज्य घटनेचे अनुच्छेद /कलम २२६ अन्वये दाद मागणेचा मार्ग उपलब्ध आहे. सबब, सदरचा अर्ज फेटाळणेत यावा.

६. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि असलेली वस्तुस्थिती यावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात, त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह नोंदविले आहेत ते खालील प्रमाणे–

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी चॅप्टर केस क्र ०६/२०२६ मध्ये केलेला कारणे दाखवा नोटीसीचा आदेश योग्य, कायदेशीर आणि बरोबर आहे काय ? | होय. |
| २ | विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी पारित केलेल्या आदेशात फेरबदल करण्याची आवश्यकता आहे काय? | नाही. |
| ३ | अंतिम आदेश काय | रिव्हीजन अर्ज नामंजूर करणेत येत आहे. |

## – कारणमिमांसा –

### मुद्दे क्र.१ व २ बाबत –

७. दोन्ही बाजूंच्या युक्तिवादचे अनुषंगाने सर्वप्रथम विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी चॅप्टर केस क्र ०६/२०२६ मध्ये केलेल्या कारणे दाखवा नोटीसचे अवलोकन करण्यात आले. या नोटीसीचे अवलोकन करता असे दिसते की, कार्यकारी दंडाधिकारी, यांनी मुख्यत्वेकरुन असे म्हटलेले आहे की, त्यांनी संबंधींचा अहवाल व इतर कागदपत्रे वाचून खात्री झाल्याने आपल्या गुन्हेगारी कृत्याला आळा बसून वर्तणूक सुधारावी याकरिता भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम १२९(ग) अन्वये खटला दाखल करुन त्याची कार्यवाही सुरु झालेली आहे व त्या कार्यवाहीस उत्तर देणे संदर्भात अर्जदारांना हजर राहणेबाबत फर्माविणेत आले आहे. त्यामुळे नोटीसीच्या कथनातून हे स्पष्ट आहे की, सदरच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने उत्तर देण्यास कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे व अंतरिम बंधपत्र अर्जदारांनी दिलेले आहे. त्यामुळे सदरची नोटीस ही संभाषणात्मक (Interlocutory) आदेश आहे किंवा कसे हे सर्व प्रथम पाहणे गरजेचे आहे.

८. या संदर्भात 2018 Cri.L.J. 1188 M.Krishnamurthy and ors. Vs. Sub–Divisional Magistrate–cum Revenue and Anr. तसेच . Allahabad High Court – Salim @ Tundal and Others Vs. State of U.P.and Others on 3 August, 2012 या न्यायनिवाडयांचा आधार घेणे न्यायोचित ठरेल. या न्यायनिवाडयाचा विचार करता कार्यकारी दंडाधिकारी यांनी पारित केलेले आव्हानीत आदेश हे संभाषणात्मक असल्यामुळे या अनुसार फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४८२ अथवा भारतीय राज्यघटना अनुच्छेद २२७(१) खालीच दाद मागणे न्यायोचित आहे. सबब या कारणांवरुन सदरचा रिव्हीजन अर्ज विचारात घेता येणार

नाही.

९. तसेच 021(3) ABR(Cri.)266–Annasaheb Baburao Teke and Ors. V/s. State of Maharashtra and Ors. या डिव्हीजन बेंचच्या न्यायनिवाडयानुसार फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम १०७ व १११ अनुसार पारित केलेल्या नोटीसी करिता स्वतंत्र आदेशाची गरज नाही. त्यामुळे प्रस्तुत कामी दाखल झालेला रिव्हीजन अर्ज रद्द होणेस पात्र आहे. करिता मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविणेत येत आहे. तसेच कार्यकारी दंडाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी पारित केलेला आदेश बेकायदेशीर चुकीचा आहे असे म्हणण्यास वाव नाही. सबब, त्यानुसार मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी व मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ३ करिता पुढील प्रमाणे आदेश करणेत येत आहे.

## – आदेश –

१. प्रस्तुतचा रिव्हीजन अर्ज नामंजूर करणेत येत आहे .

२. येणे प्रमाणे रिव्हीजन अर्ज निकाली करणेत येतो

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात जाहीर.)

Digitally signed by SANTOSH TRIBHUWONNATH TRIPATHI
Date: 2026.07.02 18:21:25 +0530

दि.०२/०७/२०२६
सिंधुदुर्ग – ओरोस

( एस.टी. त्रिपाठी )
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग – ओरोस.